# ॥ अध्याय सातवा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ गुरु म्हणती शिष्यासी । न धरावा संशय मानसीं । अनन्यैक-भक्तीनें सेवेसी । शुद्धचित्तें असावें ॥ १ ॥ श्रीगुरुचरणीं सादर । सेवेंत असावें तत्पर । कपट दंभादि अविचार । परित्यागुनी समूल ॥ २ ॥ नित्यनेमें साष्टांगनमन । आज्ञा शिरसां मानून । गुरुपदीं तनुमनधन । शिष्यें अर्पण करावें ॥ ३ ॥ ब्रह्मात्मभावें सेवितां । अभेद स्वात्मस्वरूपता । बाणे निःसंगबोध तत्त्वतां । संदेहरहित शिष्यासी ॥ ४ ॥ गुरुचरणीं सदा लीन । देव ब्राह्मण विद्वान् । संत महात्मे साधुजन । भावेंकरूनि वंदिजे ॥ ५ ॥ वेदशास्त्रीं विश्वास पूर्ण । वेदविहित आचरण । सर्वकर्म ब्रह्मार्पण । कीजे टाकूनि फलेच्छा ॥ ६ ॥ फलेच्छा अखिलकर्मांची । अवश्य त्यजिली पाहिजे साची । तरीच होय अंतःकरणाची । शुद्धि निश्चयें जाणपां ॥ ७ ॥ चित्तशुद्धि झाल्यावांचून । कांहींच न साधे साधन । वेदमहावाक्यार्थीं सावधान । कैसेंनि होय मानस ॥ ८ ॥ मुख्यत्वें अनादि वेदप्रणीत । तोचि सद्धर्म सुविहित । म्हणूनि स्ववर्णाश्रमकर्म वेदोक्त । चित्तशुद्ध्यर्थ करावें ॥ ९ ॥ त्यागूनि अन्यकर्म निंद्य । सनातनवेदप्रतिपाद्य । सुनिश्चितार्थें स्वधर्म आद्य । कर्म वंद्य आचरावें ॥ १० ॥ पाखांड सर्व टाकावें । वेदांत-सिद्धांतांसि आयकावें । न कळे तरी पुसावें । सद्विद्वानांसी अवश्य ॥ ११ ॥ श्रुत्यर्थसंपन्न ब्रह्मानुभवी । दृढबोधशक्ति क्षमा बरवी । सदाचारी जितेंद्रिय, पदवी । 'सद्विद्वान्' तयां शोभते ॥ १२ ॥ मग ते असोत ब्रह्मचारी । अथवा गृहस्थ सदाचारी । किंवा संन्यासी भिक्षाहारी । श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ दयाळु ॥ १३ ॥ ऐसें श्रीगुरुस्वामी उत्तम । तपस्व्यांची गुहा विश्राम । त्यांत प्रवेशले आत्माराम । परंधाम योगिराज

॥ १४ ॥ हिमाद्रिवरी अत्यंत शीत । तेथें वसणारे धैर्यवंत । गुहेमाजीं अग्नि सतत । ठेविती अमित तपस्वी ॥ १५ ॥ लावूनियां पाषाण थोर । निरूद्ध केलें गुहाद्वार । पुण्यगुहेआंत विवर । सुंदर शोभिवंत असे ॥ १६ ॥ तेथें सन्मानें आसनावर । बैसविले नृसिंहगुरुवर । तपस्वी जोडूनि द्वयकर । म्हणती फलाहार करावा ॥ १७॥ गुहा शोभिवंत निर्मल । शुद्ध एकांतवास-स्थल । योगाभ्यासार्थीचि केवल । निरुपाधिक उपयोगी ॥ १८ ॥ पुष्पवटिका नानाविध । उदक-प्रवाह स्वच्छ संनिध । घनदाट कुसुमसुगंध । रोगनाशक भरलासे ॥ १९ ॥ लहान थोर उभे तरु । सुवासिक चंदन मैलागरु । चंपक बकुल जाति सुरु । करवीर कल्हारादिक ॥ २० ॥ पर्वतीं बहुविध दिसे शोभा । कदंब मोगरा केतकी रंभा । पुन्नाग मालती हरिवल्लभा । जैशी इंद्रसभा साजिरी ॥ २१ ॥ हरिनेत्र हरिचंदन । पारिजातक पलाश अर्जुन । मंदार जंबीर कुंद मदन । अनेक प्रसून सुगंधित ॥ २२ ॥ भस्मधारी जटायुक्त । 'कौपिनवंत खलु भाग्यवंत' । निरुपद्रवी शुचिर्भूत । सदा शांत तपस्वी ते ॥ २३ ॥ तुंबे भरिले स्वच्छोदकें । कंदमूलफलादिकें । नृसिंहमूर्तीस रुचलें तितुकें । समर्पूनि तोषिविती ॥ २४ ॥ फलाहार जलप्राशन । झाल्यावरी हरिकीर्तन । करिती पादसंवाहन । मृदु वचनें बोलती ॥ २५ ॥ "त्यागूनि अहंकार लज्जा । देवाधिदेवा स्वामिराजा । योगाभ्यास आत्मकाजा । केला पुष्कळ सांगती ते ॥ २६ ॥ प्राणायाम समाधीयोग । शास्त्रविहित अनुद्वेग । केला त्यजूनि सकलभोग । बहुत वर्षें अभ्यास ॥ २७ ॥ परी न वाटे समाधान । तळमळीत व्यग्रमन । शोधूनि बहुत महात्मेजन । केलें सेवन तयांचें ॥ २८ ॥ किमया जडी विजयकल्प । सांगती नाना संकल्प । कोणी न दाविती निर्विकल्प । परब्रह्मस्वरूप तें ॥ २९ ॥ देहबुद्धीचे व्यवसाय । अष्ट सिद्धींचे समुदाय । साहंकारें वदती उपाय । बाह्यरंग अवघा तो ॥ ३० ॥ प्राप्त व्हावे संस्थान मठ । महंती-प्रतिष्ठार्थ खटपट । कोणत्याही प्रकारें प्रकट । लोकांत यावें प्रसिद्धीस ॥ ३१ ॥ शिष्य प्रशिष्य बहुत । असावें

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ
श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

आम्ही लोकपूजित । आमचेचि घ्यावे उपदेश विहित । सकल जनीं सर्वदा ॥ ३२ ॥ किंचित झालिया अपमान । क्रोधें तोडिती पराची मान । ऐसें असूनि मानापमान । मुखें समान म्हणती ते ॥ ३३ ॥ मनीं घट्ट विषयवासना । वरिवरी वेदांतवचना । पंडितपणें करिती व्याख्याना । केवल उदरभरणार्थी ॥ ३४ ॥ फाल्गुनमासीं बालकें गर्जती । तैसे कलियुगीं वेदांती भासती । शुष्क हृदयीं बहिर्मुख वृत्ति । अंतरीं जपती स्त्री धना ॥ ३५ ॥ कीर्तन करिती पुराण वाचिती । टिळे माळा बहुवेष धरिती । अंगारे धूप दोरे करिती । लोकांसि लाविती नादास ॥ ३६ ॥ वरिवरी दाखविती विरक्ति । अंतरीं अत्यंत विषयासक्ति । लटकें पंथ ज्ञान भक्ति । कधीं न मुक्ति मिळे तयां ॥ ३७ ॥ ऐसे काममदांध बाष्कळ । पोपटासारिखे वाचाळ । अशांचा संग स्वप्नींही एक पळ । विटाळ देखील न व्हावा ॥ ३८ ॥ असो आमचा सुदैवयोग । उदय पावला यथासांग । श्रीसद्गुरु ब्रह्मवेत्ते निजरंग । भेटले अभंग अनायासें ॥ ३९ ॥ आत्मप्राप्तीस तो काय । सांगा समर्थ सोपा उपाय । हृदयस्थ ब्रह्मात्मा निरामय । नित्योपलब्ध व्हावा जी ॥ ४० ॥ धातु शिला काष्ठ मृन्मय । देव तीर्थेंहि जलाशय । बहुतकाल सेवितां योग्य । फलद्रूप होती ते ॥ ४१ ॥ संत-गुरूसी नमस्कार करितां । अनन्यभावें शरण होतां । सहजस्थिति स्वस्वरूपता । नित्य अर्पिती शिष्यांसी " ॥ ४२ ॥ ऐकूनि तयांचे विनंतीस । ओळखिलें विशुद्धमानस । वदती नृसिंहपरमहंस । श्रोतीं उल्हासें परिसावें ॥ ४३ ॥ "तुम्ही विरागी ब्रह्मचारी । ब्रह्मविद्येचे अधिकारी । व्हाल परब्रह्मसाक्षात्कारी । याच शरीरीं अविलंबें ॥ ४४ ॥ पंचकोशांतरीं गुहा । तींत वसे अखंडात्मा महा । हृदयीं सूक्ष्मविचारें पहा । सच्चिदानंदस्वरूप ॥ ४५ ॥ दिसे जो जो विषय । तो अशाश्वत मिथ्या होय । तद्द्रष्टा अस्तिभातिप्रिय । स्वरूपात्मा आपणचि ॥ ४६ ॥ सर्वज्ञ द्रष्टा सर्वसाक्षी । अंतर्बाह्य सकल निरीक्षी । विवेकी ब्रह्मज्ञानें लक्षी । अलक्ष्यातें प्रत्यक्ष ॥ ४७ ॥ येथें मुख्यत्वें देहाहंकृति । बाह्य जड

दृश्य मनोवृत्ति । त्यागूनि वासना निश्चितीं । हृदयीं पहावें आपणा ॥ ४८ ॥ समूळ गळावा देहाभिमान । सुटावें पदार्थविषयभान । जैसें वमियेलें अन्न । पुन्हां न कोणी भक्षिती ॥ ४९ ॥ मनोबुद्ध्यादिकवृत्ति । आपल्यापासून उद्भवती । येतां जातां आपणास दिसती । त्याहूनि भिन्न आपण ॥ ५० ॥ घटद्रष्टा घटाहूनि भिन्न । तैसें अनेक वृत्ति लय उत्थान । जाणता स्वतःसिद्ध ज्ञानघन । आत्मा आपण निःशंक ॥ ५१ ॥ देहीं असूनि देहव्यापार । आपणचि पाहे विवेकचतुर । देहेंद्रियांचे न स्पर्शती विकार । म्हणूनि निर्विकार निजात्मा ॥ ५२ ॥ हा स्थूल देहमांसमय । सूक्ष्मदेह वासनामय । कारणदेह अज्ञानमय । ऐसे देहत्रय जाणिजे ॥ ५३ ॥ या देहत्रयांचे व्यवहार । असत्-जड-दृश्य विकार । आत्माचि जाणे निर्विकार । तोचि आत्मा आपण ॥ ५४ ॥ देहत्रयांच्या अवस्था तीन । जागृति सुषुप्ति स्वप्न । विश्वानर तैजस प्राज्ञ । जीवसंज्ञा अभिमानी ॥ ५५ ॥ जागृतस्वप्नसुषुप्त्यादि प्रपंच । प्रकाशक ब्रह्मात्मा साच । तो प्रत्यक्ष आहे मीच । जाणूनि बंधमुक्त होईजे ॥ ५६ ॥ स्वसंकल्पवशात् बद्ध । निःसंकल्पें मुक्त शुद्ध । संकल्पविकल्प जाणता प्रबुद्ध । स्वतःसिद्ध आत्माचि ॥ ५७ ॥ मूळचे तुम्ही ब्रह्मात्माचि असतां । ब्रह्मात्मा म्हणतां कां भितां । स्वकल्पनावशें अधःपाता । कांहो जातां वृथैव ॥ ५८ ॥ भूत येऊनि अंगांत द्विज । कल्पित बोले मी अंत्यज । वेदोक्तधर्मी ब्राह्मणवंशज । मिथ्या अंत्यज म्हणवित ॥ ५९ ॥ अथवा होतां वायुप्रकोप । भलतेंचि बडबडे वाग्जल्प । किंवा झोपेंत असतां महत् स्वल्प । बरळे ओरडे वृथा जैसें ॥ ६० ॥ पाहूनि स्वप्रतिबिंब उदकीं । बुडालों म्हणे वर काढा कीं । तैसें कल्पनावशें विलोकी । असूनि आत्मा सन्निकर्ष ॥ ६१ ॥ मिथ्या कल्पित दृश्य जड । अविद्या कल्पनेनें माजविलें बंड । तेणें जन्ममरणप्रवाहीं उदंड । बुडूनि दंड भोगिती ॥ ६२ ॥ म्हणूनि हें कल्पना-थोतांड । आत्मघातक द्वाड वितंड । पूर्णब्रह्मात्मसाक्षित्वें अखंड । निर्मूल कीजे मिथ्यात्वें ॥ ६३ ॥ ब्रह्मज्ञानाचें मुख्य तत्त्व । स्वात्मानुभवुनी विशुद्धसत्त्व । ज्याचे निमाले

विकल्प मिथ्यात्व। 'जीवन्मुक्त' पुरुष ते ॥ ६४॥ 'सर्वं खलु इदं ब्रह्म'। 'सत्यज्ञानमनंतं ब्रह्म'। 'निरामयं सोहं ब्रह्म'। तेंचि आपण निश्चयें ॥ ६५ ॥ शास्त्रदृष्टि गुरुवाक्यप्रतीति । तिसरी स्वात्मप्रतीति निश्चितीं । विविधप्रकारें जे अनुभविती । भवबंधमुक्त होती ते ॥ ६६ ॥ अस्ति-भाति-प्रियरूप ब्रह्म । जगद्रूप रूप नाम । त्यागूनि नामरूप-जगद्भ्रम । आत्मा आपण ओळखावा ॥ ६७ ॥ 'अस्ति' म्हणजे तो आहे। 'भाति' म्हणजे प्रकाशिता पाहे। 'प्रिय' म्हणजे आवडता लाहे। माझा मीच मजलागीं ॥ ६८ ॥ आपल्याकरितां सर्व प्रिय। बृहदारण्यीं मंत्राभिप्राय। वेदीं कथिलें व्हावया आत्मश्रेय। सत्यपणीं हेंचि कीं ॥ ६९ ॥ एवं अस्ति-भाति-प्रियरूप । आपण आत्मा ब्रह्मस्वरूप। महावाक्यार्थजन्य निर्विकल्प । निःशंक आपण आहों ॥ ७० ॥ परी व्हावें लागे अभ्यासन। वेदमहावाक्यार्थजन्य ज्ञान। ब्रह्माकारांतःकरणवृत्ति मन। झालें पाहिजे सुदृढ ॥ ७१ ॥ अतएव नाशनार्थ अज्ञान । 'वृत्तिव्याप्ति' अपेक्षित शास्त्रवचन। अभेद ब्रह्मात्मानुसंधान। निरसूनियां 'फलव्याप्ति' ॥ ७२ ॥ ब्रह्मवार्तेमाजीं अति कुशल । ब्रह्मवृत्तीवीण व्यर्थ फल । उदरार्थ वैखरी शब्दजाल। काय बाष्कळ कामाचें ॥ ७३ ॥ संसारभोग व्यवधान। निःशेष झालिया विषयभान । वासनाक्षय मन स्वाधीन। शुद्ध जरी असेल ॥ ७४ ॥ तरीच साधे ब्रह्मविद्या । नासे अज्ञानकार्यासह अविद्या । श्रीगुरुकृपें मोक्षसौख्या । निःशंक ते भोगितील ॥ ७५ ॥ ब्रह्ममयीवृत्तीवीण । न जावा निमिषार्ध क्षण । ब्रह्मादि सनकादि विचक्षण । योगी पूर्ण झाले अभ्यासें ॥ ७६ ॥ विषयीं मनासी अवसर । न धावा किंचित् पळभर । सहजस्थिति ब्रह्मात्मसाक्षात्कार । अभ्यास निरंतर होय तरी ॥ ७७ ॥ आवरण-विक्षेप-कषाय-लय। रसास्वाद हें विघ्नबाहुल्य। सर्व विघ्नांचा निश्चयें क्षय। खचित होय ब्रह्माभ्यासें ॥ ७८ ॥ शरीरप्रारब्ध कर्मक्षय। तोंवरी आत्मानुसंधान अक्षय । श्रीगुरुहरिभक्तप्रिय । असावें अभय साधूनि" ॥ ७९ ॥ स्वामिराजमुखें वेदसंमत। ऐकूनि बोध-परमामृत। तपस्व्यांचें चैतन्याकार चित्त । होऊनि लागली

************************************************************************

समाधि ॥ ८० ॥ समर्थकृपें निरुपाधि । बाणली परमाद्वैतसमाधि । अखंड सच्चित्सुखामधीं । समरसले तपस्वी ॥ ८१ ॥ जेथें नुरे अहंदेहबुद्धि । गवसेना मानसिक आधि । संसार जन्ममरण व्याधि । सुटोनि गेली सर्वथा ॥ ८२ ॥ नित्य स्वस्वरूपानंदगोडी । निर्विकल्प समाधीची आवडी । असेल पूर्वसुकृताची जोडी । उपलब्ध तरी होतसे ॥ ८३ ॥ सुखें उदंड प्रपंच जात । परी तीं सर्व सौख्यें नाशिवंत । सच्चिद्ब्रह्मात्मसुख निश्चित । अविनाशी बृहत् एकचि ॥ ८४ ॥ एकचि व्यापक ब्रह्मसुख । त्यावीण अवघें महद्दुःख । क्षणिक क्षयी सुखांत देख । न रमती प्रबुद्ध कदाही ॥ ८५ ॥; तपस्वी गुहेचे पश्चिमेस । व्याघ्रद्वय करिती वास । उपद्रव न देती कोणास । संतोषित वृत्तीनें ॥ ८६ ॥ तपस्वी आणि समर्थसंवाद । चालत असतां निर्विवाद । गुहेंत येऊनि बैसले अविषाद । व्याघ्र तत्त्वबोधश्रवणार्थ ॥ ८७ ॥ समर्थमुखें उपदेश शीघ्र । ऐकूनि तटस्थ झाले दोन्ही व्याघ्र । दग्ध झाले अघौघसंचय समग्र । अत्युग्र पशु असूनि ॥ ८८ ॥ पूर्वीं ते परोक्षज्ञानी । उन्मत्त पंडितमन्यमानी । शापें पावले तिर्यग्योनी । परी सुसंस्कार मनीं उरलासे ॥ ८९ ॥ संत गुरु ब्राह्मण देव । गर्वें धिक्कारिले सदैव । परापमान केले पराभव । विद्यामदें तयांनीं ॥ ९० ॥ तपस्वी ब्रह्मसुखांत निमग्न । उरलें नाहीं देहभान । रजनी उरली घटिका दोन । व्याघ्रांसी समर्थ बोलती ॥ ९१ ॥ अंतर्साक्ष दिगंबरदत्त । वदती व्याघ्रांसी कां हो पंडित । येऊनि बैसलां अंधारांत । कोपऱ्यांत कशासी ॥ ९२ ॥ सेवकजनयुक्त चामर छत्र । गजाश्वावरी भरून ग्रंथशास्त्र । देशोदेशीं तुम्ही विजयपत्र । बलात्कारें घेतलें ॥ ९३ ॥ तुम्ही बहुत विद्वज्जनांसी । अपमानिलें साधुसंतांसीं । तैसेंच विद्यागुरूसी । बहुप्रकारें कष्टविलें ॥ ९४ ॥ तुम्ही असूनि पंडित ब्राह्मण । केलें सद्धर्मखंडण । अधर्मनिजमतमंडण । केलें भांडण द्विजांसवें ॥ ९५ ॥ देव-गुरु-वेद-विप्रशाप । आणि असंख्य घडलें पाप । त्यायोगें तामसी शार्दूलरूप । अत्युग्र पशु जाहलां ॥ ९६ ॥ विद्यामद धनमद । सत्ताधिकार प्रमाद । असत्-श्रीमदांधें उन्माद । हे अतिदुःखद

परिणामीं ॥ ९७ ॥ योगीश्वर-दर्शनें हितकारी । व्याघ्रांसी उद्भवली वाग्वैखरी । येऊनि नृसिंहमूर्तीचे सामोरी । चरणांवरी लोळती ॥ ९८ ॥ जयजय हो नृसिंहमुनिवरा । जयजय हो जगदीश्वरा । जयजया जी दयासागरा । मूढांसि उद्धरा प्रभुराया ॥ ९९ ॥ जयजया जी ज्ञानप्रकाशा । जयजय हो गुरु योगीशा । जगत्पावना अविनाशा । पाशमुक्त करा जी ॥ १०० ॥ जयजय विधिहरिहरा । श्रीगुरुदेवदत्त दिगंबरा । स्वामीसमर्थ चराचरा । व्यापक सारा भरलासी ॥ १ ॥ दत्तावतार अवधूत मूर्ति । सत्ताप्रकाशक चित्स्फूर्ति । अखिल ब्रह्मांडांतर्बाह्यवर्ति । विराजित जगदात्मा ॥ २ ॥ नित्य गाती यश निगमागम । सुरवर-योगी-मुनिजन-विश्राम । साक्षी चेता केवल परंधाम । पूर्णब्रह्म सनातन ॥ ३ ॥ तव महिमा अनंत अपार । लीलाविग्रही निरंतर । अगम्य अशक्य आम्ही पामर । काय वानूं समर्थातें ॥ ४ ॥ दर्शनें वाचा फुटली तत्काल । मूक आम्ही पशु केवल । धन्यधन्य परमकृपाल । जगत्पाला बोलविलें ॥ ५ ॥ न करावा आमचा अव्हेर । मायबाप तूंचि माहेर । करूनि दीन जनांगीकार । भवसंसार पार करावें ॥ ६ ॥ त्यागूनि अविद्याभिमान मल । होऊनि लीनचित्त निर्मल । वंदिती गुरुचरणकमल । ते शार्दूल प्रेमभरें ॥ ७ ॥ विगलित देहाहंपणा । सबीज मुराला पंडितपणा । श्रीमन्नृसिंहयतिचरणां । शरणागत जाहले ॥ ८ ॥ मग समर्थे कृपाकर । ठेविला व्याघ्रमस्तकांवर । वदती श्रीकरुणासागर । श्रोतीं सादर परिसावें ॥ ९ ॥ "अविनाशीक्षेत्र काशीपुरीं । जन्म पावाल योगीउदरीं । द्विजकुलवंशीं सदाचारी । वेदवेदांगपारग ॥ ११० ॥ पश्चादिदेहीं नाहीं गति । ऐसें निगमागम गर्जती । यास्तव नृजन्म दुर्लभप्राप्ति । महत्सुकृतें होतसे ॥ ११ ॥ चौऱ्यांशींलक्ष योनि फिरतां । जीवास नसे विश्राम्यता । न साधे परमपुरुषार्थता । नृजन्मावीण कदाहि ॥ १२ ॥ म्हणूनि श्रेष्ठ नरदेह । मोक्षद्वार आत्मागेह । सहजें प्राप्त पर इह । ईश्वरानुग्रहासी पात्र कीं" ॥ १३ ॥ ऐसें व्याघ्रांसि बोधितां । उदयासि

आला सविता । जागृति आली समस्तां । पशुपक्ष्यादिकांतें ।। १४ ।। कोकिला आळवी पंचमस्वर । पक्षी बोलती प्रभातीं मधुर । भगवन्नामाचा गजर । हरिदास भक्त करिती ।। १५ ।। षट्चक्रदेवताध्यान । अजपाजप संकल्पून । हंसःसोहं-स्वरूपाधिष्ठान । हृदयीं मुनिजन जपती ।। १६ ।। गुरुदैवताराधन । प्राणायामसंयमन । देवतादि विष्णुपत्नी नमून । पाद स्पर्शिती योग्यादि ।। १७ ।। तेव्हां व्याघ्रांसि वदती नारायण । तपस्व्यांचें मस्तकावघ्राण ।। करावें हो पंडित आपण । समाधिव्युत्थान होईल ।। १८ ।। मग तपस्व्यांचें मस्तक व्याघ्रीं हुंगिलें । तात्काल ते देहशुद्धी-वर आले । स्वस्वरूपानंदीं रंगले । प्रेमें वदिलें गुरुचरणां ।। १९ ।। नंतर तपस्व्यांनीं शौचमुखमार्जन । विधिपूर्वक केलें स्नान । संध्यावंदनादि कृत्य जाण । पूजनादिक आटोपिलें ।। १२० ।। मग श्रीसमर्थांसी स्नान । यथासांग घालिती प्रेमेंकरून । परमात्मापुरुष अलौलिक जाणून । सद्भावें तयांसी सेविती ।। २१ ।। त्या हिमाद्रीच्या पायथ्यासमीप । एक संन्यासी मौन्यरूप । करितां झाला अत्युग्र तप । दत्तदर्शनाकारणें ।। २२ ।। षट्त्रिंशति संवत्सर । अनुष्ठान केलें निराहार । परंतु दत्तात्रेयदर्शन एकवार- । देखिल झालें नसे तया ।। २३ ।। कंटाळूनि झाला निराश । म्हणे कैसा गुरु-मंत्रोपदेश । फळला नसे लवलेश । बहुत क्लेश भोगुनी ।। २४ ।। मी महापापी केवळ । कैसा उद्धरिला अजामिळ । काय कामाचें तपोबळ । धिक्कार असो मजलागीं ।। २५ ।। ऐसा संन्यासी तळमळित । तों निद्रिस्त असतां स्वप्नांत । दत्तात्रेय दाविती दृष्टांत । श्रोतीं एकचित्तें ऐकावा ।। २६ ।। हिमाद्रीवरी पुण्यगुहा । आम्रवृक्षासमोर पहा । तेथें दत्तात्रेययोगी-महा । वसती जावें तद्दर्शनार्थ ।। २७ ।। ऐसा दृष्टांत स्वप्नीं होत । मग तो यति होऊनि जागृत । नित्यविधि सारूनि त्वरित । आला गुहेसंनिध ।। २८ ।। पाहूनि व्याघ्र भयंकर । भयभीत झाला यति फार । तयासी म्हणती योगीश्वर । भीतोसि कां रे व्यर्थचि ।। २९ ।। स्वप्न भ्रांति चेष्टा मस्करी । कांहीं न चिंता भीति तस्करीं । त्वदीय

इच्छा श्रेयस्करी । आतां निर्धारीं होईल ॥ १३० ॥ मग दत्तात्रेयस्वरूप सगुण । दाविलें त्रिगुणात्मक पूर्ण । तपस्वी व्याघ्र यति लोटांगण । वारंवार घालिती ॥ ३१ ॥ म्हणती आजी पुरले मनोरथ । गुरुदत्तात्रेय स्वामीसमर्थ । नेत्रीं अवलोकिले यथार्थ । झालें सार्थक तपाचें ॥ ३२ ॥ बालार्कवद्दिव्यप्रभा शांत । मालाजटामुकुटमंडित । पुष्पालंकारभूषित । श्रीगुरुदत्त देखिले ॥ ३३ ॥ अनंतजन्मांचें सुकृत । फळलें दत्तदर्शन अद्भुत । अप्राप्त तें प्राप्त निश्चित । बहिरंतरीं लाभलें ॥ ३४ ॥ व्याघ्रांसी वदती स्वामी । पुण्यक्षेत्रीं जन्माल काशीग्रामीं । पुनर्दर्शन होईल अंतर्यामीं । मुक्तियोगक्षेमरूप ॥ ३५ ॥ सद्गुरु सांगती तपस्व्यांसी । अद्वैतसमाधि बाणली तुम्हांसी । क्षेमरूप असावें स्वस्थतेसीं । पूर्वी कथिल्यान्वयें ॥ ३६ ॥ संन्याशासी म्हणती बरवा । ब्रह्मस्वरूपानुभव घ्यावा । ब्रह्मविद्यातारक संसारभवा । प्राप्त झाली तुम्हांसी ॥ ३७ ॥ मग तपस्वी आणूनि आरती । मनोभावें ओवाळिती । मंत्रपुष्पांजली प्रदक्षिणा करिती । लोटांगण घालिती वारंवार ॥ ३८ ॥ ऐसें परमानंदमय त्रिभुवन । पुष्पें वर्षती देव विमानांतून । उत्साहसमारंभांत अत्रिनंदन । अंतर्धान पावले ॥ ३९ ॥ सर्वांसी वाटलें आश्चर्य । एकाकालीं आनंद विस्मय धैर्य । आम्हांस करूनि कृतकार्य । श्रीगुरुवर्य गुप्त झाले ॥ १४० ॥ समर्थगुरुमहिमा अनंत । गातां थकले वेदशेषादि बहुत । ते श्रीगुरु-स्वामीलीलामृत । स्वयें वदविती निश्चयें ॥ ४१ ॥ पुढील अध्याय भक्तिरसपूरित । ऐका विद्वज्जन श्रोते संत । जो वेदशास्त्रसुविहित । सद्धर्महितकारक ॥ ४२ ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्र-पुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । सप्तमाध्याय गोड हा ॥ १४३ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे सप्तमोऽध्यायः समाप्तः ॥ ७ ॥ श्रीगुरुदेवदत्त—स्वामीसमर्थ ॥ ॥